**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ नागपूर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दाखल झालेले अपील क्रमांक 1444/2013**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर,
प्रशासकिय इमारत क्र.2, सिव्हील लाईन्स,
नागपूर-440 001.

श्री. शरद विनायक भांगे ,
ग्रेट नाग रोड, इमामवाडा चौक, नागपूर - ०३ : अपिलार्थी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (नाहप), नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर स्टेशन रोड, नागपूर -०१ : उत्तरवादी

जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अधिकारी, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर स्टेशन रोड, सदर नागपूर -०१ : उत्तरवादी

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | अपील क्रमांक | : | 1444/2013 |
| 2 | सुनावणीची तारीख | | दि. 01.11.2014 |
| 3 | आज रोजीची उपस्थिती | | |
| 3.1 | अपिलार्थी - | : | उपस्थित |
| 3.2 | जन माहिती अधिकारी तथा | : | उपस्थित |
| 3.4 | जन अपिलीय अधिकारी तथा | : | उपस्थित |
| 4 | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. 08.02.2013 |
| 5 | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. 27.02.2013 |
| 6 | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. 22.03.2013 |
| 7 | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. 16.04.2013 |
| 8 | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. 28.06.2013 |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

2. आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी दिनांक 08.02.2013 च्या माहिती अर्जान्वये प्लॉट नं. 40A आणि 41 मधील जागा, खसरा नं. 301 मौजा-धंतोली (IAIB) घाटरोड आणि इमामवाडा ले-आऊट, नागपूर या विषयावर खालील माहिती मागितलेली आहे.

"इ.स. 2008 मध्ये श्री आदमने आणि श्री भांगे यांच्यात वरील वर्णन भूखंडा चा वाद हायकोर्टात प्रलंबित असताना NIT नी श्री आदमने यांना भूखंडाची विक्री करिता ना हरकत प्रमाणपत्र दिले ते कोणत्या (NIT च्या) कायदयाच्या तरतुदी आधारे माहिती दया ".

(टीप - अपिलार्थीच्या मूळ माहिती अर्जातील मजकूर जसाचा तसा घेतला आहे.)

3. सदर अर्जात जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता यांनी दिनांक 27.02.2013 ला खालीलप्रमाणे प्रतिसाद दिला.

"भुखंड क्र. 40 व 41 मधील जागेसाठी प्रन्यासने विक्रीकरीता दि. 18/7/2008 रोजी ना हरकत प्रमाणपत्र दिलेले आहे. धारिकेतील उपलब्ध अभिलेखानुसार दि.18/07/2008 पर्यन्त या जागेविषयी कुठलाही न्यायालयीन वाद असल्याचे किंवा प्रलंबित असल्याचे दस्ताऐवज नाहीत किंवा तशी माहिती उपलब्ध नाही. करीता प्रन्यासच्या सर्व साधारण नियमाप्रमाणे भुखंडधारकाने विक्रीच्या ना हरकत प्रमाणपत्राची मागणी केल्याने सर्व तांत्रिक बाबी तपासून ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आले."

(टीप - जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तरातील मजकूर जसाचा तसा घेतला आहे.)

4. माहिती अपूर्ण व चुकीची दिली असे कारण देवून अपिलार्थीने दिनांक 22.03.2013 च्या पत्रान्वये प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अधिकारी यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक 03.04.2013 रोजी सुनावणी घेवून खालीलप्रमाणे आदेश पारित केले.

"सहायक अभियंता तथा माहिती अधिकारी यांनी अर्जदाराला दिनांक 27.02.2013 रोजीच्या पत्रानुसार अपिलार्थीने मागितलेली माहिती अनुक्रमांक 1 व 2 नुसार दिलेली दिसते. सहायक अभियंता तथा माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तरानुसार 18.07.2008 पर्यत या जागेविषयी न्यायालयीन वाद प्रलंबित असल्याचे कोणतेही दस्तावेज धारिकेत उपलब्ध नसल्याने दिनांक 18.07.2008 रोजी विक्री करिता ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आले."

माहिती अधिकार अधिनियमानुसार धारिकेत उपलब्ध असलेल्या दस्तावेज अपिलार्थी यांना देता येऊ शकते, मात्र त्यावर कोणतेही भाष्य किंवा स्पष्टीकरण देणे अपेक्षित नाही. त्यामुळे अर्जदाराला अपेक्षित माहिती सहायक अभियंता तथा माहिती अधिकारी यांनी दि.27.02.2013 रोजी दिली असल्याने, उपरोक्त अपील खारीज करण्यात येत आहे."

(टीप - प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या आदेशातील मजकूर जसाचा तसा घेतला आहे.)

5. माहिती अपूर्ण व चुकीची दिली असे कारण देवून अपिलार्थीने दिनांक 27.06.2013 (प्राप्त दिनांक 28.06.2013) च्या पत्रान्वये आयोगाकडे कलम 19 (3) अन्वये व्दितीय अपील दाखल केले. त्यावर आज दिनांक 01.11.2014 रोजी सुनावणी ठेवली असता अपिलार्थी उपस्थित आहेत.

अधिनियमातील तरतुदीनुसार माहितीचा अर्ज ज्यावेळी प्राप्त होतो त्यावेळी जी माहिती उपलब्ध आहे ती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. तसेच माहिती ज्या स्थितीत उपलब्ध आहे ती त्याच स्थितीत उपलब्ध करुन देणे अभिप्रेत आहे. माहिती तयार करुन देणे, माहिती दुसऱ्या कार्यालयाकडून प्राप्त करुन घेऊन उपलब्ध करुन देणे, माहितीचे संस्करण करुन देणे, प्रश्नार्थक माहिती देणे, माहिती तक्त्यामध्ये उपलब्ध करुन देणे, एखाद्या कार्यवाहीमागील कारणे/खुलासा देणे या प्रक्रियेचा अथवा या स्वरुपातील माहितीचा अधिनियमातील कलम 2(च) मध्ये स्पष्ट केलेल्या माहिती या शब्दाच्या व्याखेत समावेश होत नसल्यामुळे अशी माहिती अपिलार्थी यांना देय होत नाही.

प्रस्तूत प्रकरणी जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दिलेले उत्तर योग्य असल्याने अपिल निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येते.

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ नागपूर**

**नागपूर**
**दिनांक 01.11.2014**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर

प्रत,

१. श्री. शरद विनायक भांगे ,
ग्रेट नाग रोड, इमामवाडा चौक, नागपूर -

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (नाहप), नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर स्टेशन रोड, नागपूर -01

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अधिकारी, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर स्टेशन रोड, सदर नागपूर -01

४. निर्णय नस्ती





राज्य माहिती आयोग नागपूर